# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



लोकमत पुणे, गुरुवार, दि. १ फेब्रुवारी २०१८ २

सलील कुलकर्णी : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

# सत्ता, संपत्तीपेक्षा जगण्यातील समृद्धता अनुभवा

लोकमत न्यूज नेटवर्क

कवितेचं मागं होताना या विषयावर बोलताना सुप्रसिद्ध संगीतकार, गायक, लेखक डॉ.सलील कुलकर्णी.

सकाळ
पुणे, गुरुवार
१ फेब्रुवारी २०१८
५

# ...तर जगण्याचीही कविता होते : कुलकर्णी

राजगुरूनगर, ता. ३१ : "माणसांमधून गाणं येतं, माणसांविषयी जाणत लिहावं वाटतं. कविता ही अस्वस्थतेतून जन्माला येते, पण अस्वस्थतेशिवाय सूर लागत नाही. जगणं समृद्ध पाहिजे. आवडीच्या क्षेत्रात आनंदाने काम करता आले की जगण्याचीही कविता होते," असे सांगत संगीतकार व गायक डॉ. सलील कुलकर्णी यांनी श्रोत्यांशी संवाद साधला.



सलील कुलकर्णी

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'कवितेचं गाणं होताना' या विषयावर ते बोलत होते. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी त्यांच्याशी बातचीत केली तेव्हा ते उत्स्फूर्त बोलत गेले आणि त्याबरोबर गातही गेले. डॉ. कुलकर्णी म्हणाले, "सत्ता, संपत्ती हे सगळं उथळ आहे. माझं माझं न करता आवडीच्या क्षेत्रात आनंदाने काम करताना प्रत्येकाने समृद्ध आयुष्य जगण्याचा प्रयत्न करायला हवा. पैशाची, कलेची किंवा कुठल्याही ताकदीची धुंदी चढू देऊ नये. माजोरीपणा करू नये."

यावेळी त्यांनी काही गीते सादर केली. गीतकार सुधीर मोघे, कवयित्री शांताबाई शेळके, कवी विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, ग्रेस यांच्या कविता सादर केल्या.

पं. हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर यांच्या आठवणी सांगितल्या व त्यांची लोकप्रिय गीतेही सादर केली. सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. उमेश जगताप यांनी केला. आभार ऋत्विक काळे यांनी मानले.

१० केसरी पुणे, ३१ जानेवारी २०१८

# सत्ता, संपत्तीपेक्षा जगण्यातील समृद्धता अनुभवा

## डॉ. सलील कुलकर्णी

राजगुरूनगर, (वार्ताहर) : सत्ता, संपत्ती हे सगळं उथळ असून माझं माझं न करता आवडीच्या क्षेत्रात आनंदाने काम करताना प्रत्येकाने समृद्ध आयुष्य जगण्याचा प्रयत्न करायला हवा, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध संगीतकार, गायक, लेखक डॉ. सलील कुलकर्णी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'कवितेचं गाणं होताना' या विषयावर बोलत होते.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. सलील कुलकर्णी.

यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक शांताराम घुमटकर, ॲड. माणिक पाटोळे, उमेश आगरकर, अंकुश कोळेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल राक्षे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, शंकर घोमले, अजित डोंगस, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सलील कुलकर्णी म्हणाले, आजकाल कोणीही पैशाची, कलेची किंवा राजकारणातील ताकदीची टिमकी वाजवीत असून समाजात बेडरपणा, निर्लज्जपणा अथवा पैशाची धुंदी वाढत चालली आहे. मात्र माणसाच्या मेंदूमधील एक छोटीशी रक्तवाहिनी तुमचं बोलणं चालू ठेवायचे की बंद करायचे हे ठरवू शकते. या पार्श्वभूमीवर माणसाने माणुसकी धर्म पाळला नाही तर माणसाची माय असलेली माती जेव्हा हिशोबाला बसते तेव्हा कोणालाच सोडत नाही, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

दरम्यान त्यांनी उपस्थितील आनंद, मनाला उल्हास व प्रसन्नतेचा भाव देणारी 'अग्गोबाई ढग्गोबाई' तसेच 'हे गजवदन, येई गा विठ्ठला, क्षण अमृताचे, आयुष्यावर बोलू काही, ही गीते सादर केली. यशस्वी गीतकार सुधीर मोघे, कवयित्री शांताबाई शेळके, कवी विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, ग्रेस या कवींच्या कवितांचे वेगवेगळे पदर, त्यातील सौंदर्यस्थळे उलगडून दाखविली.

तर डॉ. सलील कुलकर्णी यांच्याशी मुलाखतीच्या माध्यमातून उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. उमेश जगताप यांनी केला तर आभार ऋग्वेद काळे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख